अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. ३ डिसेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ६४ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## ‘आयपीएल :२०२४’ साठी १,१६६ खेळाडूंनी केली नोंदणी



मुंबई : इंडियन प्रीमिअर लीग २०२४साठी होणाऱ्या लिलावासाठी स्टार खेळाडूंसह एकूण ११६६ जणांनी नावे नोंदवली आहेत, परंतु मुंबई इंडियन्सने करारमुक्त केलेल्या जोफ्रा आर्चरचे नाव या यादीतून गायब आहे. १ हजार १६६ खेळाडूंच्या नावाची यादी आयपीएल आयोजकांकडे सोपवण्यात आली आहे आणि १९ डिसेंबरला दुबईत हा लिलाव पार पडणार आहे.

मिचेल स्टार्क, पॅट कमिन्स, ट्रॅव्हिस हेड, डॅरिल मिशेल आणि रचीन रवींद्र यांसारखे वर्ल्ड कप गाजवणाऱ्या खेळाडूंसाठी १० फ्रँचायझींमध्ये चढाओढ पाहायला मिळेल. लीगमध्ये फ्रँचायझी शोधू पाहणाऱ्या जागतिक नावांपैकी आहेत. जोश हेझलवूड आयपीएलच्या काही सामन्यांना मुकणार असला, तरी त्यानेही नाव नोंदवले आहे. ११६६ खेळाडूंमध्ये ८३० भारतीय आणि ३३६ परदेशी खेळाडू आहेत. यापैकी २१२ खेळआडू कॅप्ड आहेत, तर ९०९ अनकॅप्ड आणि ४५ संलग्न देशांतील आहेत. ८३० भारतीय खेळाडूंपैकी १८ कॅप्ड खेळाडूंमध्ये वरुण आरोन, केएस भरत, केदार जाधव, सिद्धार्थ कौल, धवल कुलकर्णी, शिवम मावी, शाहबाज नदीम, करुण नायर, मनीष पांडे, हर्षल पटेल, चेतन सकारीया, मनदीप सिंग, बरिंदर सरन, शार्दूल ठाकूर, जयदेव उनाडकट, हनुमा विहारी, संदीप वॉरियर्स व उमेश यादव हे आहेत. कॅप्ड भारतीयांपैकी फक्त चार हर्षल पटेल, केदार जाधव, शार्दूल ठाकूर आणि उमेश यादव यांची मूळ किंत २ कोटी ठेवली आहे.

# तुफान राडा!

# राजेश टोपे यांची गाडी फोडली, लोणीकरांच्या घरावर दगडफेक

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**जालना शहर अजूनही धुमसत आहे. मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांच्या उपोषणस्थळी लाठीचार्ज झाल्यानंतर त्याचे पर्यावसान राज्यभर जाळपोळीत झाले. आता जालन्यातील डीसीसी बँकेच्या निवडणुकीतील संताप बाहेर पडला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माही मांत्री राजेश टोपे आणि भाजप नेते बबनराव लोणीकर यांच्यात शनिवारी प्रचंड राडा झाला. टोपे यांची गाडी फोडण्यात आली.त्यानंतर लोणीकर यांच्या घरावर दगडफेक झाली.याप्रकरणी या दोनही नेत्यांनी एकमेकांवर आरोप केले आहेत.या प्रकरणावरून जालन्याचे राजकारण तापण्याची चिन्हे दिसत आहेत.**

जालना जिल्हा बँकेची निवडणूक राष्ट्रवादीचे नेते राजेश टोपे, भाजपचे बबनराव लोणीकर, शिंदे गटाचे अर्जुन खोतकर आणि केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांचे भाऊ भास्कर दानवे यांनी बिनविरोध करत १७ उमेदवार निवडून आणले होते. बँकेचे अध्यक्षपदही वाटून घेण्यात आले होते.

या बँकेची निवडणूक एकमेकांच्या कट्टर विरोधकांनी बिनविरोध केली खरी परंतू या विचित्र युतीत माजी मंत्री राजेश टोपेंच्या कारच्या काचा फोडण्यात आल्या. विचित्र युतीचे पडसाद अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवडीतच दिसून आले होते. लोणीकरांच्या कार्यकर्त्यांनी टोपे यांच्या कारवर शाईफेकही केल्याची तक्रार खुद्द टोपे यांनी केली आहे तर आपल्या घरावर टोपेंच्या समर्थकांनी दगडफेक केल्याची प्रतितक्रार लोणीकर यांनी केली आहे. यावरून आता टोपे विरुद्ध लोणीकर असा संघर्ष सुरु झाला आहे. लोणीकर यांच्या कार्यकर्त्यांनी माझ्या गाडीवर लाठ्या-काठ्यांनी व दगडफेक करून हल्ला केल्याचा आरोप टोपे यांनी केला आहे. त्यांना जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष पद पाहिजे होते, हेच यामागचे कारण होते. परंतू, आम्ही टर्म वाटून घेतली होती व आमची बारी होती. पुढच्या वेळेस लोणीकर गटाचे अध्यक्ष होणार होते.

### ‘डीसीसी’तील संतापाचा उद्रेक







**शेजारी... शेजारी... झाले पक्के वैरी... :** टोपे यांची गाडी फोडल्याच्या घटनेनंतर आक्रमक झालेल्या टोपे समर्थकांनी लोणीकरांच्या घरावर हल्ला केला केल्याचा आरोप होत आहे. यावेळी बबनराव लोणीकर आणि त्यांच्या भावाच्या घरावर दगडफेक करण्यात आली. दरम्यान, याची माहिती मिळताच लोणीकर समर्थक देखील घटनास्थळी दाखल झाले. तसेच, लोणीकरांच्या घराच्या बाजूला असलेल्या राजेश टोपे यांच्या भावाच्या घरावर लोणीकर समर्थकांनी दगडफेक केली. त्यामुळे घटनास्थळी तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

#### जशास तसे उत्तर ...

बँकेच्या आवारात टोपेंची कार उभी असताना अज्ञातांकडून दगडफेक करण्यात आली. या हल्ल्यात कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.टोपे जिल्हा मध्यवर्ती बँकेत दाखल झाले होते. राजेश टोपे यांची कार जिल्हा बँकेच्या आवारात उभी होती. तेव्हा अज्ञातांनी कारच्या समोरील काचेवर दगडफेक केली. तसेच, कारवर ऑइलही फेकले आहे.टोपे यांच्या गाडीवर दगडफेक करण्यात आल्याच्या घटनेनंतर आता माजी मंत्री बबनराव लोणीकर यांच्या घरावर अज्ञात लोकांनी दगडफेक केल्याची घटना समोर आली आहे. अचानक आलेल्या अज्ञाताच्या घोळक्याने बबनराव लोणीकर आणि त्यांचे बंधू यांच्या घरावर दगडफेक केली आहे.टोपे व लोणीकर समर्थकांनी एकमेकांना जशास तसे उत्तर दिले.

शिंदे गटाचे नेते अर्जुन खोतकर हे सुद्धा या ठरलेल्यात आहेत. असे असतानाही हा हल्ला होणे हे लोकशाहीला व जालना शहराला व जिल्ह्याला शोभणारे नाही, अशी टीका टोपे यांनी केली आहे.

माझा प्रयत्न आहे की हे प्रकरण जास्त पुढे जाऊ नये. मी दोघांनाही या ठिकाणी बोलणार आहे की झालेला प्रकार इथे थांबवूया. लोणीकरांना सांगणार आहे की या प्रकाराचे स्पष्टीकरण द्यावे, असे खोतकर यावेळी म्हणाले.यावर लोणीकरांकडूनही उत्तर आले आहे. जालना मध्यवर्ती बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याचे ठरले होते. व्हाईस चेअरमन लोणीकर गटाला देण्याचे राजेश टोपेंनी आश्वासन दिले होते.

टोपेंनी लोणीकर गटासोबत विश्वासघात केला आहे. कार्यकर्त्यांच्या अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न केल्यामुळे कार्यकर्त्यांनी टोपेंची गाडी फोडली आहे. टोपेंच्या गाडीचे नुकसान आम्ही भरून देवू. टोपेंनी संघर्ष करू नये, संघर्ष केल्यास आम्ही देखील रस्त्यावर उतरू, असा इशारा लोणीकर यांनी दिला आहे.

---

## पंढरपुरात ११ महिन्याच्या बालिकेचे अपहरण करणाऱ्या महिलेस अटक

सुराज्य/पंढरपूर

पंढरपूर येथे एका अकरा महिन्याच्या बालिकेचे अपहरण करणाऱ्या महिलेस अटक करण्यात आली आहे.

पंढरपूर शहर पोलीस ठाण्याकडून मिळालेल्या माहितीनुसार प्रदीप ज्ञानेश्वर कारंडे (वय-३० वर्षे, शिवाजी चौक, पंढरपूर) यांची पुतणी सानिका संदीप कारंडे हिचे बुधवार, दि. २९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडे पाच वाजण्याच्या सुमारास टाकळी रोड, पंढरपूर येथून लता राजू वेताळ (वय-३५, जगदंबानगर, टाकळी रोड) हिने पळवून नेले होते. तिने फिर्यादीची भोळसर भावजय लक्ष्मी हिच्या ताब्यातून पुतणी सानिकाला पळविले होते.

पुतणी गायब असल्याची फिर्याद प्रदीप कारंडे यांनी शहर पोलीस ठाण्यात दिली. त्यानंतर पंढरपूर शहर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवून संशयित आरोपी लता राजू वेताळ हिला शुक्रवार, दि. १ डिसेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता अटक केली. तपास पंढरपूरचे पीएसआय जगताप, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण फुगे करीत आहेत.

## ट्रॅक्टरच्या धडकेने शाळकरी मुलीचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर



उसाने भरलेल्या ट्रॅक्टरची धडक बसून झालेल्या अपघातात एका नऊ वर्षीय शाळकरी मुलीचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी सकाळी कुंभारखाणी (मोहोळ) परिसरात घडली. गुंजन जयपाल पवार (वय-९, कुंभारखाणी) असे मृत मुलीचे नाव आहे.

यातील मयत गुंजन ही शनिवारी सकाळी शाळा असल्याने घरी आई-वडिलांना शाळेला जाते असे सांगून घरातून गेली. थोड्या वेळातच गुंजनचे वडील जयपाल पवार यांना त्यांच्या मित्राचा फोन आला. गुंजनला ट्रॅक्टरने धडक दिली आहे. ती ट्रॅक्टरच्या ट्रॉलीच्या चाकाजवळ पडल्याने तिच्या कमरेला जोराचा मार लागल्याचे सांगितले. गुंजन ही मोहोळ बाभूळगाव रोडवर कुंभारखाणी येथील देशमुख वस्ती शाळेत शिकत होती. घरातून सकाळी साडेसात वाजता शाळेला जाते, म्हणून गेली असता ट्रॅक्टरने धडक दिल्याने ती गंभीर जखमी झाली होती. उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाला. जयपाल पवार हे तातडीने त्या ठिकाणी गेले. गुंजनला मोहोळ येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी आणले असता डॉक्टरांनी तपासून ती उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषित केले. या घटनेची खबर जयपाल पवार यांनी मोहोळ पोलिसात दिली आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक ज्योतिबा पवार करीत आहेत.

## दारुच्या नशेत इसमाची आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

दारूच्या नशेत एका ४५ वर्षीय इसमाने विहिरीत आत्महत्या केली. ही घटना कुंभारी (दक्षिण सोलापूर) येथे शनिवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली.

बाबुराव शंकर भंडे (वय-४५, कुंभारी) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. त्याला दारूचे व्यसन होते. तो शुक्रवारी रात्री घरातून गेला होता. शनिवारी सकाळी त्याचा मृतदेह गावातील नागवडियार गल्लीतील विहिरीतील पाण्यावर तरंगताना आढळून आला. त्याच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. या घटनेची नोंद वळसंग पोलिसात झाली. यामागचे कारण समजले नाही. तपास हवालदार बनकर करीत आहेत.

## अठरा लाखांची साखर विकून व्यापाऱ्यास गंडवले

### तिघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा

सोलापूर : अठरा लाखांची साखर दिलेल्या पत्त्यावर पोच करतो, अशी थाप मारून ती साखर परस्पर विकून फसवणूक केल्याची घटना पंढरपुरात घडल्याचे नुकतेच उघडकीस आले. या प्रकरणात पंढरपूर शहर पोलिसांनी लातूरमधील दोन, सांगलीतील एक अशा तिघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.





या संदर्भात अभिजीत उत्तम कौलवार (पंढरपूर) यांनी पोलिसांत फिर्याद दिली. केदारनाथ ऊर्फ बबलू बिडवे, त्याचे वडील जगन्नाथ बिडवे (लातूर), अक्षय पाटील (तासगाव, सांगली) या तिघांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला. ते सद्या फरार आहेत. कोलवार यांचे पंढरपूर येथे पद्माकर ट्रेडिंग नावाचे कार्यालय आहे. त्यांनी लातूर येथील गणेश ट्रेडर्स यांना ५०० क्विंटल साखर देण्याचे ठरविले होते. ती साखर त्यांना पुरवतो, असे सांगून बिडवे पिता-पुत्राने मिळून दि. २५ मे २०२३ रोजी मंगळवेढा येथील संत दामाजी साखर कारखान्यातून १८ लाख २६ हजार रुपये किमतीची (५००) क्विंटल साखर कोलवार यांच्या नावावर घेतली. ती साखर लातूर येथील गणेश ट्रेडर्स यांना पोहोच न करता परस्पर तासगाव (सांगली) येथील अक्षय अनिल पाटील यांना विकली. फसवणूक केली, असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. तपास फौजदार घोगरकर करीत आहेत.

## लाचप्रकरणी विक्रम राजपूत यांचे निलंबन

सोलापूर : एमआयडीसी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक विक्रम प्रतापसिंग रजपूत यांनी १ लाख रुपयांची लाचेची मागणी केल्याप्रकरणी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने शुक्रवारी ताब्यात घेतले होते.

याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. दरम्यान, शनिवारी पोलीस उपनिरीक्षक रजपूत यांना निलंबित करण्यात आले. अशी माहिती पोलीस उपायुक्त अजित बोऱ्हाडे यांनी दिली. तक्रारदार यांचे मित्र यांचेवर दाखल असलेल्या गुन्ह्याचा तपास हा पोलीस उपनिरीक्षक विक्रम रजपुत करत होते.

त्या गुन्ह्यामध्ये मदत करण्यासाठी व तक्रारदार यांचे मित्र यांचेवर प्रतिबंधक कारवाई न करण्यासाठी पीएसआय विक्रम रजपुत यांनी २ लाख रुपयांची लाचेची मागणी करुन तडजोडी अंती १ लाख रुपये लाच रक्कम स्वीकारण्याची तयार दर्शवील्याचे पडताळणी कारवाईमध्ये निष्पन्न झाल्याने पोलीस उपनिरीक्षक विक्रम रजपुत यांच्यावर कारवाई करण्यात आली होती. आता रजपुत यांची या प्रकरणात प्राथमिक चौकशी होईल.

## बँक एजंटाला तीन लाखास गंडविले : दोघांवर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

फायनान्समध्ये ठेवलेले दागिने सोडवून तुम्ही सांगाल, त्या बँकेत गहाण ठेवतो, अशी थाप मारून बँकेच्या एजंटास तीन लाख रुपयास गंडविल्याची घटना सांगोल्यात घडली. या प्रकरणात सांगाला पोलिसांनी हर्षल पाटील आणि त्याच्या साथीदाराविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

यासंदर्भात किरण बाळासाहेब भोसले (वाकीशिवणे, सांगोला) या बँक एजंटानी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्यांच्याकडे हर्षल पाटील, अन्यएक असे मिळून त्यांची भेट घेतली. आमचे दागिने एका फायनान्स कंपनीत आहे. ते दागिदे सोडवून तुम्ही सांगेल त्या बँकेत गहाण ठेवतो, अशी थाप मारली. दागिने सोडवण्यासाठी तीन लाखाची गरज आहे. तोपर्यंत तुम्ही पैसे द्या असे सांगितले. त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून भोसले यांनी पैसे जमा करून त्यांना दिले. त्यांच्यासोबत दागिने आणण्यासाठी फायनान्स पर्यंत गेले होते. तेथे गेल्यावर दोघांनी तुम्ही येथेच थांबा. आम्ही दागिने सोडवून आणतो. असे सांगून दुचाकीवरून पसार झाले. असे भोसले यांच्या फिर्यादीत नमूद आहे. तपास हवालदार मोहोळकर करीत आहेत.



### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



साहेब, तुमची हरवलेली सगळी पाने सापडली !!!

कल्याण

120-31-489

# आ.राऊतांनी मुदतवाढीची मागणी हाणून पाडली

### जिल्हा बँकेत आर्थिक नुकसानीच्या जबाबदारी निश्चितीस वेग

सुराज्य/सोलापूर

**भारतीय जनता पक्ष पुरस्कृत बार्शीचे अपक्ष आमदार राजेंद्र राऊत यांनी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या गैरव्यवहाराच्या चौकशी प्रकरणात बारीक लक्ष घातले आहे. त्यांच्या याचिकेवरूनच माजी संचालकांवर दोषारोप ठेवण्यात आले आहेत. चौकशी प्रकरणात वेळकाढूपणा होत असल्याने राऊत यांनी पुन्हा न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने चौकशीला मुदतवाढ देण्यास नकार दिला आहे, त्यामुळे चौकशी अधिकारी तथा निवृत्त अतिरिक्त निबंधक डॉ. किशोर तोष्णीवाल यांनी या प्रकरणी आता आठवड्याला सुनावणी घेण्याचा निर्णय घेतला आहे.**

सोलापूर जिल्हा सहकारी बँकेच्या गैरव्यवहार प्रकरणात आर्थिक नुकसानीस जबाबदार असलेल्या माजी संचालकांवर जबाबदारी निश्चित करण्यात येत आहे. जिल्ह्यातील सर्वपक्षीय आजी-माजी आमदारांचा या प्रकरणात समावेश आहे. लोकसभा निवडणूक जसजशी जवळ येत आहे, तसतशी चौकशीला गती येऊ लागली आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या चौकशीचा लोकसभा निवडणुकीपूर्वी सोक्षमोक्ष लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

जिल्हा बँकेचे दहा माजी संचालक आाणि दहा अधिकारी-कर्मचारी असे वीसजण नुकतेच झालेल्या सुनावणीला उपस्थित होते. या दहा अधिकारी-कर्मचाऱ्यांपैकी आठ जणांनी गैरव्यवहार आणि आर्थिक



नुकसानीप्रकरणी आपले म्हणणे मांडले आहे. मात्र, दोन कर्मचाऱ्यांनी आपले म्हणणे देण्यास टाळाटाळ करीत मुदत वाढवून मागितली. माजी संचालकांमध्ये माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे, सुजाता अंत्रोळीकर, प्रकाश पाटील, भैरू वाघमारे, सुनिता बागल यांनी वकिलांच्या माध्यमातून म्हणणे मांडले.

#### पाच संचालकांची मुदतवाढीची मागणी

माजी संचालक आ. संजय शिंदे, राजशेखर शिवदारे, माजी महापौर नलिनी चंदेले, माजी आमदार धनाजी साठे, रामदास हाके यांनी दोषारोप पत्रावर आमचे म्हणणे सादर करण्यासाठी मुदतवाढ द्यावी, अशी मागणी केलेली आहे. त्यावर चौकशी अधिकारी डॉ. तोष्णीवाल यांनी कोणतेही उत्तर दिलेले नाही. पण, आर्थिक नुकसानीच्या जबाबदारी निश्चित करण्याच्या संदर्भाने नोटीस न स्वीकारणाऱ्या, म्हणणे न मांडणाऱ्या पुढाऱ्यांबाबत ठोस निर्णय घेण्याची शक्यता आहे.

आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यासाठीची चौकशी सहा महिन्यांत पूर्ण झाली नाही, त्यामुळे चौकशी समिताला मुदतवाढ मिळावी, अशी मागणी सहकार विभागाकडून उच्च न्यायालयात केली होती. पण या प्रकरणाचे याचिकाकर्ते राजेंद्र राऊत यांनी मुदतवाढ देऊ नये, अशी मागणी याचिकेद्वारे केली आहे. राऊतांची मागणी मान्य करत न्यायालयाने मुदतवाढीची मागणी फेटाळून लावली आहे.

चौकशीसंदर्भात कोर्टाकडून अद्यापपर्यंत कोणतेही निर्देश आलेले नाहीत, त्यामुळे चौकशीची प्रक्रिया सुरू ठेवण्यात आल्याचे समजते.